अवतीभवती

## शिवसेना, एमआयएमच्या उमेदवारांचे अर्ज

नांदेड : महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १३ - 'ड' च्या पोटनिवडणुकीत सोमवारी (ता. २०) शिवसेना, एमआयएम, तसेच एका अपक्ष उमेदवाराने अर्ज दाखल केले. आतापर्यंत सात उमेदवारांनी नऊ अर्ज दाखल केले असून मंगळवारी (ता. २१) अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे. श्रीगुरू गोविंदसिंगजी स्टेडियम परिसरात असलेल्या निवडणूक कार्यालयात सोमवारी शिवसेनेच्या वतीने एकनाथ गवळकर यांनी अर्ज दाखल केला. त्याचबरोबर एमआयएम पक्षातर्फे साबेर चाऊस यांनी अर्ज दाखल केला आहे. त्याचबरोबर रफिकखान रऊफखान यांनी अपक्ष म्हणून दोन अर्ज दाखल केले आहेत. आतापर्यंत सात उमेदवारांनी नऊ अर्ज दाखल केले आहेत. त्यामध्ये जफरअली खान पठाण, अजीज कुरेशी, लतीफ उल जफर कुरेशी, मकबुल बी. अब्दुल हमीद, साबेर चाऊस, रफिकखान रऊफखान आणि एकनाथ गवळकर यांचा समावेश आहे. अद्याप काँग्रेसच्या वतीने अर्ज दाखल झाला नसून तो मंगळवारी होणार आहे. इच्छुक उमेदवारांना ता. २१ जानेवारीपर्यंत दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज दाखल करता येणार आहे. अर्जांची छाननी ता. २२ जानेवारीला, तर उमेदवारी अर्ज ता. २४ जानेवारीपर्यंत मागे घेता येणार आहेत. निवडणूक चिन्ह ता. २५ जानेवारीला देऊन निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी त्याच दिवशी प्रसिद्ध होईल. सदर निवडणुकीसाठी ता. सहा फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत मतदान होणार असून मतमोजणी ता. सात फेब्रुवारी रोजी होणार आहे.

# एकनाथ गरूडकर यांची उमेदवारी दाखल



# मनपा पोटनिवडणूक : नऊ अर्ज दाखल

FIEDS

# चौफाळा प्रभागात सेना, एमआयएमचे अर्ज

# उमेदवारी अर्ज दाखल

# ७ उमेदवारांचे ९ अर्ज दाखल